पोलीस निरीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

**प्रेस नोट** दि. २४/०७/२०२५

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमध्ये कार्यरत असलेले लोकसेवक श्री. वसंत गंगाराम देगलूरकर, मुख्य स्वच्छता अधिकारी तसेच लोकसेवक श्री. सुदर्शन शांताराम जाधव, सफाई कामगार, प्रभारी स्वच्छता निरीक्षक यांना लाच स्विकारतांना अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने ताब्यात घेतले.....

| | | |
|---|---|---|
| अँन्टी करप्शन ब्युरो/घटक | :— | ठाणे युनिट |
| पोलीस स्टेशन डायरी नोंद क्रमांक | :— | म.फुले चौक पोलीस स्टेशन, ठाणे पोलीस आयुक्तालय<br>पोलीस स्टेशन डायरी नोंद क्र. ६६/२०२५, २०.५५ वा. दि.२४.०७.२०२५ |
| लोकसेवकाचे नांव व कार्यालय | :— | १) लोकसेवक श्री. वसंत गंगाराम देगलूरकर, वय ५५ वर्षे, पद— मुख्य स्वच्छता अधिकारी, नेमणूक — घनकचरा व्यवस्थापक विभाग, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, २/ब प्रभाग खडकपाडा (अति.कार्यभार) मुख्य स्वच्छता अधिकारी ( मुख्यालय), सर्वोदय मॉल, २ माळा, कल्याण (पश्चिम), जि.ठाणे (वर्ग— ३)<br>२) लोकसेवक श्री. सुदर्शन शांताराम जाधव, वय ४२ वर्षे, पद — सफाई कामगार, सध्या —प्रभारी स्वच्छता निरीक्षक, उंबार्डे हजेरी शेड, २/ब प्रभाग, खडकपाडा, कल्याण (प.), जि.ठाणे(वर्ग— ४) |
| मागितलेली लाचेची रक्कम | :— | २५,०००/—रू |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | :— | २०,०००/—रू. |
| थोडक्यात हकीगत | :— | यातील तक्रारदार कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमध्ये सफाई कामगार म्हणून कार्यरत असून तब्येत बरी नसल्याने कामावर हजर नव्हते. तक्रारदार यांना कामावर हजर करुन घेण्यासाठी लोकसेवक श्री. वसंत गंगाराम देगलूरकर, मुख्य स्वच्छता अधिकारी, नेमणूक — घनकचरा व्यवस्थापक विभाग, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, २/ब प्रभाग खडकपाडा (अति.कार्यभार) मुख्य स्वच्छता अधिकारी (मुख्यालय), सर्वोदय मॉल, २ माळा, कल्याण (पश्चिम), जि.ठाणे यांनी तक्रारदार यांचेकडे रु. ३०,०००/— रुपयाची लाचेची मागणी केली होती. परंतु तक्रारदार यांना लोकसेवक वसंत गंगाराम देगलूरकर यांना लाच दयावयाची नसल्याने त्यांनी दिनांक १८/०७/२०२५ रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात लेखी तक्रार नोंदवली.<br>सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक १८/०७/२०२५, दि. २१/०७/२०२५, दि. २२/०७/२०२५ व दि. २३/०७/२०२५ रोजी पडताळणी कारवाई केली असता, दि. २२/०७/२०२५ रोजीचे पडताळणीमध्ये लोकसेवक वसंत गंगाराम देगलूरकर, पद— मुख्य स्वच्छता अधिकारी यांचे मार्फतीने तक्रारदार यांचेकडे २५,०००/— रु. मागणी केल्याचे निष्पन्न झाले व दि. २३/०७/२०२५ रोजीचे पडताळणीमध्ये लोकसेवक सुदर्शन शांताराम जाधव यांनी तक्रारदार यांना २५,०००/— रु. लाचेची रक्कम लोकसेवक वसंत गंगाराम देगलूरकर यांचेकडे देण्यास सांगितले.<br>परंतु २५,०००/— रु. लाचेची रक्कम जास्त होत असल्यामुळे तक्रारदार यांनी लाचेची रक्कम कमी करण्यास सांगितली असता, लोकसेवक सुदर्शन शांताराम जाधव यांनी तक्रारदार यांना त्यापैकी थोडेफार कर बाकी नंतर कर असे सांगितल्याचे निष्पन्न झाले.<br>त्याअनुषंगाने दि. २४/०७/२०२५ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई मध्ये लोकसेवक वसंत गंगाराम देगलूरकर यांना तक्रारदार यांचेकडुन वरील प्रमाणे मागणी केलेली २५,०००/— रुपये लाचेचे रक्कमेपैकी २०,०००/— रुपये लाचेची रक्कम स्विकारतांना दि. २४/०७/२०२५ रोजी १४:४८ वा. रंगेहात पकडण्यात आले आहे.<br>तसेच लोकसेवक श्री. वसंत गंगाराम देगलूरकर व श्री. सुदर्शन शांताराम जाधव यांना ताब्यात घेण्यात आले असून, त्याबाबत म.फुले चौक पोलीस स्टेशन येथे स्टेशन डायरी नोंद क्र. —६६/२०२५ वेळ २०.०० वा. दि.२४.०७.२०२५ अन्वये नोंद घेण्यात आलेली आहे. सदर बाबत पुढील कारवाई सुरू आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी—मा.श्री.शिवराज पाटील, सो.पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**
**मा.श्री.संजय गोविलकर सो.अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र,ठाणे**
**मा.श्री.सुहास शिंदे सो.अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र,ठाणे**

अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्ट्राचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.


१) संपर्क पत्ता :—लाप्रवि, ठाणे मध्यवर्ती कारागृहा समोर, ठाणे पश्चिम ४००६०१
२) संकेत स्थळ :— acbmaharashtra@mahapolice.gov.in
३) ई—मेल आयडी :— spacbthane@mahapolice.gov.in
४) अॅप्लीकेशन :— acbmaharashtra.net
५) टोल फ्री क्र. :— १०६४
६) दुरध्वनी क्रमांक :—०२२—२०८१३५९९


Anupama

**( अनुपमा खरे )**
**पोलीस निरीक्षक,**
**अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे.**